इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१.
इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिकांना/गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करात सूट देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक: एमयुएम-२०२१/प्र.क्र. १३४/नवि-१७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- २० ऑगस्ट, २०२१

वाचा :-

१) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, शासन निर्णय क्र.एनरीए-२०२०/प्र.क्र.१६७/ता.क.२, दि.२२.१२.२०२०.

२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, शासन निर्णय क्र.मइवाधो-२०२१/प्र.क्र.२५/तां.क.४, दि.२३.०७.२०२१.

**प्रस्तावना:-**

शासनाने संदर्भाधीन क्र. २ येथील शासन निर्णयान्वये महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ दिनांक ३१.०३.२०२५ पर्यंत राज्यामध्ये राबविण्यास मान्यता दिलेली आहे. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. २.४.२ (पायाभूत चार्जिंग व्यवस्था निर्मितीसाठीची प्रोत्साहने) मधील बाब क्र. २ नुसार, नगारी स्थानिक संस्थांमधील मालमत्ताधारकांना मालमत्ता करात सूट देण्यासंदर्भात नागरी स्थानिक संस्थांच्या कायद्यातील तरतूदी पहाता, नगर विकास विभाग (नवि-२) शी संबंधित इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिकांना/गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करात सूट देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

मालमत्ता करात सूट देण्यासंदर्भात नागरी स्थानिक संस्थांच्या कायद्यातील तरतूदी पहाता, इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिकांना/गृहनिर्माण संस्थांना महाराष्ट्र इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ लागू असेपर्यंत त्यांच्या मालमत्ता करात सूट देण्याबाबत शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे:-

(१) स्वतःच्या इलेक्ट्रीक वाहनाकरीता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातून इतर इलेक्ट्रीक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास, मालमत्ता करात २% सूट देण्यात यावी. तथापि, रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता मालमत्ता धारकाने घ्यावी.

(२) गृहनिर्माण संस्थांमध्ये सामायिक सुविधांतर्गत सदस्यांना इलेक्ट्रिक वाहन चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास मालमत्ता करात ५% इतक्या कमाल मर्यादेपर्यंत सूट देण्यात यावी.

(३) गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या मालकीच्या जागेत व्यापारी तत्त्वावर इलेक्ट्रिक वाहन चार्जिंगची सुविधा, मुळ पार्किंग वगळता अन्य मोकळ्या जागेत केल्यास, मात्र त्यामुळे आपत्कालीन कामाकरीता ती



जागा अडचणीची असू नये. सदर मोकळ्या जागेचा वापर व्यापारी कारणाकरीता होणार असला, तरी त्या जागेकरीता व्यापारी दराने मालमत्ता कराची आकारणी न करता, ती घरगुती दराने करावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०८२०१३०७४९७०२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Kailas Madhukar Badhan

( कैलास बधान )
उप सचिव, महाराष्ट्र शासन